# हातुर्ली मये येथे वनमहोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी**
डिचोली

डॉन बॉस्को कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरच्या विद्यार्थ्यांनी सरकारी प्राथमिक विद्यालय हातुर्ली मये येथे विद्यालयाच्या शिक्षिका व पालक शिक्षक संघाच्या सहकार्याने वन महोत्सव साजरा केला. विद्यालयाच्या शिक्षिका आशा गावस, रेखा शेट, वैभवी प्रभू व सोनाली नाईक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप मदत केली. मुलांमध्ये झाडांविषयी प्रेम निर्माण व्हावे, त्यांना झाडांचे महत्व समजावे व झाडांचे आपण संरक्षण करावे या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ॲग्रीकल्चरच्या विद्यार्थ्यांनी मुलांसाठी निसर्गावर चित्रकला स्पर्धा व बडबडगीत स्पर्धा घेतली. चित्रकला स्पर्धेत प्रथम यथार्थ गवंडे, द्वितीय विघ्नेश मोरजकर, बडबडगीत गायन स्पर्धेत प्रथम नव्या कवठणकर, द्वितीय वैभवी कळंगुटकर यांना बक्षिसे प्राप्त झाली.

यावेळी विजेत्यांना बक्षिसे वितरित करण्यात आली. सर्व मुले, शिक्षक, पालक व ॲग्रीकल्चरच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयासमोर झाडे लावली. यावेळी विद्यालयाच्या शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांना झाडांचे महत्व पटवून सांगितले.

सलोनी पाटील, प्रीती वेळीप, आशु कुमारी, प्रतिभा मिशाळ, असिल्दा वाझ, पूजा फडते या डॉन बॉस्को कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्य अनुभव कार्यक्रमांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



**डिचोली : हातुर्ली सरकारी प्राथमिक विद्यालयात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसोबत शिक्षक,पालक,तसेच आयोजक डॉन बॉस्को अग्रीकल्चरचे विद्यार्थी**